सं.फौ.ख.क्र.६१०/२०२५

सरकार -वि- शेखर, **नि.क्र.२१**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — जयपाल यशवंतराव मरस्कोल्हे

वय. ४३ वर्षे, व्यवसाय — मजुरी, राह. – गोबरवाही, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत</u>**

माझी मोठी मुलगी सद्या नर्सिंगचे शिक्षण घेत आहे. आरोपीला मी ओळखतो. तो पोलिस ठाणे गोबरवाही येथे मला भेटला होता. घटना एक वर्षापुर्वी घडली होती. मला माझ्या मोठ्या मुलीने फोन करून माहिती दिली की, एक मुलगा तिला छेडखानी करत आहे. त्यानंतर मी माडगी येथील घटनास्थळी गेलो होतो. त्याठिकाणी माझी मोठी मुलगी व आरोपी हजर दिसले. त्यानंतर मी माझ्या मुलीला घेवुन पोलिस ठाणे, गोबरवाही येथे आलो. पोलिसांनी माझ्या मुलीला दवाखान्यात उपचारासाठी पाठविले. सरकारी दवाखान्यात तिला झालेल्या जखमेवर उपचार करण्यात आले. तिला आरोपीने काचेची बॉटल फेकुन मारल्याने डाव्या हातावर जखम झाली होती.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जगनाडे यांच्या मार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे जुने वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी गोबरवाही ते तुमसर येथे बसने व कधी कधी ट्रेनने जा ये करत होती. आरोपी सुध्दा जा ये करत होता किंवा काय व त्यामुळे त्याची माझ्या मुलीसोबत ओळख होती किंवा काय ते मला माहीत नाही. ते दोघेही एकमेकांशी फोनवर बोलत होते किंवा काय ते मला माहीत नाही. माझी मुलगी आरोपीला स्वत:हुन फोन करून तिला सोडण्यासाठी बोलवायची किंवा काय ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची बाब ही सर्वांना माहिती होती. सदर घटनेची तारीख मला माहीत नाही परंतु त्या घटनेस एक वर्ष झालेले असावे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेच्या दिवशी माझ्या मुलीने स्वत:हुन आरोपीस फोन करून ती त्याच्या मोटरसायकलवर बसुन माडगी येथे गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती

माडगी येथे गेली होती. ती मोटरसायकलने गेली होती किंवा काय ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते दोघेही माडगी येथे गेले देवदर्शन घेतले व नदीच्या काठावर फिरत होते. हे म्हणणे खरे आहे की, माडगी येथे नृसिंह मंदिर आहे व तेथे वर्षातुन दोनदा यात्रा भरत असते. हे म्हणणे खरे आहे की, दररोज सायंकाळच्या वेळेस लोक नदीकाठी फिरायला येत असतात. नदीकाठी लोक नाष्ता करत असते किंवा काय ते मला माहीत नाही. ते नदीकाठी कचरा फेकत असतात किंवा काय ते मला माहीत नाही. त्याचप्रमाणे नारळाची टोकरे फेकत असतात किंवा काय ते मला माहीत नाही. नदीच्या काठावर रेती असल्यामुळे चालातंना अडचन निर्माण होते किंवा काय ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझी मुलगी नदी काठी चालत असतांना माझ्या मुलीचा पाय घसरून ती खाली पडली व तिला निर्माल्यापैकी काहीतरी लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. ०२.०६.२०२६ | दि. ०२.०६.२०२६ |